# <u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. ३४४/२०१९ मधील</u>
# <u>निशाणी–५२ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादींनी प्रतीदाव्यातील वादी यांच्या प्रतिदाव्यास मुदत कायदयाची बाधा येते तसेच प्रतिदाव्यातील वादीस प्रतिदावा करण्याचे कोणतेही कारण घडले नाही यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ड) अन्वये दावा काढून टाकण्यात यावा त्याचप्रमाणे प्रतिवादींचा दावा आदेश ८ नियम ६ अ व क अन्वये वगळुन टाकावा याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिदाव्यातील प्रतिवादीं यांचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादाव्यातील वादी यांनी दावा मिळकती बाबतचे दि. ०५/०६/२००० रोजीचे दस्त क्र. १४३१/२००० रद्द करण्यात यावा याआशायाचा प्रतिदावा दि. १३/०८/२०१९ रोजीच्या कारणावरून दि. २३/०६/२०२३ रोजी दाखल केलेला आहे त्यामुळे प्रतिदाव्यातील वादींच्या प्रतिदाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येत आहे. त्याचप्रमाणे सदरील प्रतिदाव्यास दाखल करण्यास कोणतेही कारण नसल्याने सदरील प्रतिदावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ड) अन्वये दावा काढून टाकण्यात यावा त्याचप्रमाणे प्रतिदाव्यातील वादी यांचा दावा हा स्वतंत्र दाव्याचा विषय असल्याने प्रस्तुतच्या प्रतिदाव्यास आदेश ८ नियम ६ अ अन्वये वगळने आवश्यक आहे त्यामुळे प्रतिदावा वगळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जास प्रतिदाव्यातील वादी यांनी **निशाणी– ५५** अन्वये म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला आहे. प्रतिदाव्यातील वादीने पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी प्रतिदाव्यात दिलेले दाव्यास कारण व दाव्यातील मागणी कायदेशीर तरतुदी प्रमाणे असुन त्यास कोणत्याही कायदयाची बाधा येत नाही. त्याचप्रमाणे प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुतच्या दावा मिळकती संदर्भातच मागणी केली असल्याने तो स्वतंत्र दाव्याचा विषय होत नाही. त्यामुळे प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचा सदरील अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी – प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. कायद्याची अशी स्थिर स्थिती आहे की, आदेश ७ नियम ११ अन्वये अर्ज निकाली काढताना वादी यांच्या केवळ दाव्यातील कथने पाहणे गरजेचे आहे. कैफीयतीमधील बचाव विचारात घेता येणार नाही. तसेच वादी यांचा दावा आदेश ७ नियम ११ अन्वये नामंजूर करण्यास पात्र आहे कि नाही याकरीता दाव्यातील मजकुर हा खालील अटींची पुर्तता करतो की नाही हे पाहणे गरजेचे आहे.

(१) जेव्हा दाव्यातून काही वाद कारण दिसून येत नसेल,

(२) जो अनुतोष मागितला असेल त्याचे मुल्य कमी दाखविले असेल व न्यायालय निश्चित करील अशा मुदतीच्या आत न्यायालयाने त्याला मुल्यांकनात सुधारणा करण्यास सांगितले असता वादीने तसे करण्यास कसुर केला असेल,

(३) मागितलेल्या अनुतोषाचे योग्य मुल्यांकन करण्यात आले असेल, तरी वादपत्र अपु–या मुल्याचा मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहीलेले असेल आणि न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत न्यायालयाने त्याला आवश्यक तो मुद्रांकित कागद सादर करण्यास सांगितले असता, वादीने तसेच करण्यास कसुर केली असेल,

(४) वादपत्रात केलेल्या निवेदनावरुन दाव्याला एखाद्या कायद्यानुसार रोख आहे असे दिसत असेल.

६. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी यांच्या प्रतिदाव्यात दाव्यास कारण नमुद केलेले नाही त्याचप्रमाणे त्यांच्या प्रतिदाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येते याउलट प्रतिदाव्यातील वादी यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला आहे की, प्रतिदाव्यातील वादीने प्रतिदाव्यात कारण नमुद केलेले आहे त्याचप्रमाणे त्याच्या प्रतिदाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येत नाही. वरील परस्परविरोधी युक्तीवादाच्या अनुशंगाने प्रतिदाव्याचे अवलोकन केले असता, प्रतिदाव्यातील वादी यांनी त्यांच्या प्रतिदाव्यात दाव्यास कारण नमुद केलेले आहे.

त्याचप्रमाणे मुदतीचा मुद्दा हा घटना (Fact) व कायदयाच्या असा संमीश्र मुद्दा असल्याने त्याबात पुराव्या घेतल्याशिवाय हा मुद्दा या टप्पयावर ग्राहय धरणे न्यायोचीत होणार नाही. त्यामुळे प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांच्या युक्तीवादामध्ये मला तथ्य दिसुन येत नाही.

७. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी यांचा प्रतिदावा हा स्वतंत्र दाव्याचा विषय असल्याने सदरील प्रतिदावा आदेश ८ नियम ६ अ अन्वये वगळण्यात यावा. याउलट प्रतिदाव्यातील वादी यांनी युक्तीवाद केला आहे की, सदरील प्रतिदाव्यात त्यानी दावा मिळकती संदर्भातच मागणी केलेली असुन सदरील मागणी ही प्रस्तुतच्या दाव्यातील वादी विरूध्द असुन सदरील मागणी ही स्वतंत्र दाव्याचा विषय होत नाही. त्याचप्रमाणे सदरील मागणी ही मुदतीत केलेली असुन सदरील प्रतिदावा हा लेखी जबाबा सोबत दाखल केलेला आहे त्यामुळे प्रतिदाव्यास आदेश ८ नियम ६ अ ची बाधा येत नाही. वरील परस्परविरोधी युक्तीवादाच्या अनुशंगाने प्रतिदाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतच्या दाव्यातील वादी यांनी ते दि. ०५/०६/२००० रोजीचे दस्त क्र. १४३१/२००० दावा मिळकतीचे मालक झाल्याचे घोषीत करावे अशी मागणी केलेली आहे तर प्रतिदाव्यातील वादी यांनी सदरील दावा मिळकतीबाबत दि. ०५/०६/२००० रोजीचे झालेला दस्त क्र. १४३१/२००० रद्द करून मागीतलेला आहे त्याचप्रमाणे सदरील मागणी ही प्रस्तुत दाव्यातील वादींविरूध्दच आहे त्यामुळे सदरील मागणी ही स्वतंत्र दाव्याचा विषय होत नाही त्याचप्रमाणे प्रतिदाव्यातील वादी यांनी सदर प्रतिदावा हा मुद्दे कायम करण्याच्या आधी व लेखी जबाबा सोबत दाखल केलेला आहे त्यामुळे प्रतिदाव्यास आदेश ८ नियम ६ अ ची बाधा येते या मुळ दाव्यातील वादी यांच्या युक्तीवादात मला तथ्य दिसुन येत नाही.

८. प्रतिदाव्यातील वादी यांनी युक्तीवाद करतवेळेस मा. उच्च व सर्वाच्च न्यायालय यांच्या न्यायनिवाडे **i) Mahesh Govindgi Trivedi Vs. Bakul Maganlal Vyas and Ors.** 2022 **Live Law (SC)** 836, **ii) Mahendra Kumar And Anr Vs. State of M.P And Ors.**

1987 **AIR** 1395, **iii**) **Ashok Kumar Kalra Vs**. **Wing Cdr Surendra Agnihotri AIRONLINE** 2019 (**SC**) 1525 **iv**) **Suo Motu Write Petition No**. 3/2020 वर भिस्त ठेवलेली आहे. वरील सर्व न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता, सदरील न्यायनिवाडे मधील परिस्थीती व प्रस्तुतच्या दाव्यातील परिस्थीती वेगळी असल्याने तसेच सदरील न्यायनिवाडे प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्याकरीता कसे उपयुक्त आहेत हे प्रतिदाव्यातील वादी हे सांगण्यास असमर्थ ठरल्याने आदराने वरील सर्व न्यायनिवाडे या दाव्यास लागु होणार नाहीत.

९. वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

MAHESH SUNILDATT BHARAD

Digitally signed by MAHESH SUNILDATT BHARAD
Date: 2024.12.31 11:48:16 +0530

दिनांक : ०५/१२/२०२४.

**(श्री. एम. एस. भरड)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.